# महाराष्ट्र मंडळ पिकनिक / क्रिकेट मॅच

फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळातर्फे दरवर्षी काही ठराविक कार्यक्रम आयोजित केले जातात त्यापैकीच एक म्हणजे मंडळाची पिकनिक. यावर्षीची पिकनिक दि १ एप्रिल २००६ रोजी चँडलर येथील अॅरोहेड पार्क येथे आयोजित करण्यात आली होती परंतु यावर्षीच्या पिकनिकचे स्वरूप मात्र पूर्णत: भिन्न होते. आणि या स्वरूपामुळेच यावर्षीच्या पिकनिकला मिळालेला फिनिक्सवासियांचा प्रतिसाद हा अभूतपूर्व म्हणायला हवा असा होता.

भारतीय माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी तो आपले क्रिकेटचे वेड बरोबर घेऊनच जातो. जितका आनंद त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावरचे क्रिकेटचे सामने बघण्यात मिळतो तितकाच आनंद आपले चार मित्र जमवून गल्ली क्रिकेट खेळण्यातही मिळतो. भारतीय आणि त्यातूनही मराठी माणसाची हिच आवड लक्षात घेऊन मंडळाने यावर्षी क्रिकेट मॅच आयोजित केली होती. त्यामुळे तरुणांचा या कार्यक्रमाला विशेष करून प्रतिसाद लाभला. याचठिकाणी क्रिकेट मॅचच्या वेळी पतंगही विकायला ठेवण्यात आले होते.

सकाळी साडेआठ वाजल्यापासून भराभर एकएक करून माणसं जमायला सुरुवात झाली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून उत्साह ओसंडून वहात होता. सगळे जमल्यावर खेळाडूंचे दोन संघ पाडण्यात आले. हे सगळे होईपर्यंत बायका इथे नाश्त्याची तयारी करत होत्या. १५ ओव्हर्सची मॅच खेळायची असं ठरलं पटपट नाश्ता उरकुन खेळ सुरू झाला. खेळाडूंइतकाच खेळाचा आनंद प्रेक्षकही लुटत होते. टाळ्या, शिट्ट्यांसह खेळाडुंना उत्तेजन देणं चालु होतं त्याचवेळी पार्कच्या दुसऱ्या भागात काहीजण पतंग उडविण्याचा आनंद लुटत होते. सुदैवाची

गोष्ट म्हणजे त्यादिवशी वाराही खूप छान होता त्यामुळे प्रत्येकाचा पतंग उंच आकाशात भराऱ्या मारत होता. लहान मुलं तर सगळीकडे मुक्तपणे बागडत होती.

मॅच संपल्यावर जिंकलेल्या संघाच्या कॅप्टनच्या हस्ते मोठ्ठा केक कापण्यात आला. टाळ्यांच्या गजरात सगळ्यांनी जिंकलेल्या संघाचं अभिनंदन केलं. खेळून दमलेल्या सर्वांनीच मग दुपारच्या जेवणाचा मनसोक्त आस्वाद घेतला. जेवता जेवता सगळ्यांच्या छान गप्पा रंगल्या होत्या पण जेवण झाल्यावर मात्र सकाळी आलेली दमछाक आणि दुपारचं पोटभर जेवण यामुळे घरी जाऊन ताणून देण्यासाठी प्रत्येकाने एकमेकांचा निरोप घ्यायला सुरुवात केली.